**ठळक बातम्या**

- उसाच्या मळीवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरुन ५ टक्के करण्याचा जीएसटी परिषदेचा निर्णय
- सिक्किमधल्या पुरात मृत्यू झालेल्यांची संख्या ३० वर, मृतांमध्ये लष्कराच्या ८ जवानांचा समावेश
- इस्त्राइलमध्ये युद्ध सुरू असल्याची प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानहू यांची घोषणा, हमासच्या हल्ल्यात ४० जणांचा मृत्यू, ७०० जण जखमी

  **आणि**
- आशियाई स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंना आज ६ सुवर्ण पदक, एकूण पदकांची संख्या १०७ वर

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं उसाच्या मळीवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आणला आहे. यामुळं ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटी परिषदेच्या ५२ व्या बैठकीनंतर नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषेदत सांगितलं. भरड धान्याचा ७० टक्क्यांहून अधिक समावेश असलेल्या सुट्या पीठावर जीएसटी न लादण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. पॅकिंग केलेल्या पीठावर ५ टक्के जीएसटी लागेल. जीएसटी लवादासाठीच्या सदस्यांची वयोमर्यादाही आजच्या बैठकीत वाढवली. पाणी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य, साफसफाई, कचरा व्यवस्थापन, झोपडपट्टी विकास यासारख्या सुविधांना जीएसटीतून सूट देण्याची शिफारसही आजच्या बैठकीत परिषदेनं केली.

**<><><><><>**

देशातून दहशतवाद समूळ उखडून टाकण्याची वेळ आली आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. डेहराडूनमध्ये आयोजित झालेल्या एकोणपन्नासाव्या अखिल भारतीय पोलीस विज्ञान काँग्रेसमध्ये ते आज बोलत होते.

दहशतवादाचा सामना करण्यासाठी आता आपल्याला शून्य सहिष्णुता धोरण राबवावं लागेल, असं ते म्हणाले. देशाच्या प्रगतीसाठी देशाची कायदा आणि सुव्यवस्था, अंतर्गत सुरक्षा आणि सीमा सुरक्षा मजबूत कराव्या लागतील. गेल्या नऊ वर्षांत केंद्र सरकारनं जम्मू-काश्मीर, नक्षलग्रस्त भाग आणि ईशान्येकडची कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यात महत्त्वाची कामगिरी केली आहे, असं केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितलं. टिहरी जिल्ह्यातल्या नरेंद्र नगर इथं केंद्रीय क्षेत्रीय परिषदेच्या चोविसाव्या बैठकीचं अध्यक्षपदही अमित शहा यांनी भूषवलं.

<><><><><>

सिक्किममध्ये आलेल्या पूरात लष्कराच्या ९ जवानांसह एकूण तीस जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सिक्किम आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली आहे. तिस्ता नदीला आलेल्या पुरात ८१ जण वाहून गेल्याची भितीही व्यक्त करण्यात येत आहे. सिक्किम मध्ये जागोजागी आलेल्या पुरांत आतापर्यंत १ हजार ३२० घरांची पडझड झाली असून अडीच हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. पुरग्रस्तांच्या मदतीसाठी ३० शिबिरं उघडण्यात आली असून त्यात एकूण ७ हजार लोकांची सोय करण्यात आली आहे. पुरस्थितीमुळे राज्यातले १७ पुल वाहून गेल्याची माहितीही आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली आहे.

सिक्किम चे मुख्यमंत्री प्रेम सिंग तमांग यांनी आज पुरग्रस्त भागाचा दौरा केला. रस्त्यांच्या पुर्नबांधणीला आपलं सरकार सर्वोच्च प्राधान्य देणार असून तातडीच्या मदतीसाठी आर्थिक मदतही करण्यात येणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. सिक्किमच्या पूरस्थितीवर केंद्र सरकार लक्ष ठेऊन आहे आणि राज्याला हवी ती सर्व मदत करणार असल्याचं गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांनी म्हटलं आहे.

सिक्किममध्ये जीव गमावलेल्या लष्कराच्या जवानांप्रती संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इसरोनं नियोजित गगनयान मोहिमेची तयारी सुरु केली असून त्याकरता फ्लाइट टेस्ट वेहिकल ऍबॉर्ट मिशन वन बनवायला सुरुवात केली आहे. या मोहिमेच्या दृष्टिकोनातून मानवरहित यानाच्या उड्डाणाच्या चाचण्या लवकरच सुरु केल्या जाणार असल्याचं इसरोनं समाज माध्यमावरच्या एका संदेशात म्हटलं आहे. २०२४ पर्यंतच्या नियोजित मानवी आणि मानवरहित मोहिमांच्या दृष्टिकोनातून इसरो अंतराळवीर प्रणालीची उपयुक्तताही पडताळून पाहणार आहे.

या सर्व चाचण्या श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रात घेतल्या जाणार आहेत.

या मोहिमांच्या दृष्टीने निवड करण्यात आलेले ४ अंतराळवीर बंगळुरू इथं प्रशिक्षण घेत असल्याचं आणि गगनयान मोहिमेसाठी HLVM3 या प्रबळ रॉकेट प्रक्षेपकाचा वापर केला जाणार असल्याचं इसरोनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

स्थापना दिनाच्या दिवशी उद्या भारतीय हवाई दलाचं बोध चिन्ह बदलण्यात येणार आहे. प्रयागराज मधल्या बामरौली इथं होणाऱ्या संचालनादरम्यान हवाई दल प्रमुख एयर चीफ मार्शल वी आर चौधरी नव्या बोध-चिन्हाचं अनावरण करतील. यामध्ये अशोक चिन्ह, हवाई दलाची क्षमता दाखवणार पंख पसरलेला हिमालयन गरुड, हलक्या निळ्या रंगात भारतीय वायू सेना आणि वायूसेनेचं घोष वाक्य यावर असणार आहे. हे बोध-चिन्ह हवाई दलाच्या झेंड्याच्या वरच्या भागात डाव्या बाजूला झळकणार आहे.

भारतीय हवाई दलाचं हे नवं बोध-चिन्ह या दलाच्या नीतिमूल्यांना अधिक चांगल्या प्रकारे अधोरेखित करणार आहे. भारतीय हवाई दलाचा जुना झेंडा उतरवण्यात येणार असून यापुढं तो या दलाच्या संग्रहालयात ठेवला जाईल.

**<><><><><>**

इस्राइलमध्ये युद्ध सुरू असल्याची घोषणा प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानहू यांनी केली आहे. हमासनं आज इस्राइलच्या दक्षिण आणि मध्य भागात अचानक रॉकेट हल्ले केल्यानंतर ते बोलत होते. या हल्ल्यात आतापर्यंत ४० जणांचा मृत्यू झाला असून ७०० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. इस्राइलच्या काही सैनिकांना ताब्यात घेतल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून गाझामध्ये हवाई हल्ले केल्याचं इस्राइलच्या लष्करानं सांगितलं.

जगभरातल्या अनेक नेत्यांनी हमासच्या या हल्ल्यांचा निषेध केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हमासच्या या हल्ल्याबद्दल निषेध व्यक्त केला आहे. या कठीण प्रसंगी इस्राइलच्या पाठिशी भारत उभा असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

या पार्श्वभूमीवर भारत सरकारनं इस्रायलमधल्या भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि सुरक्षा नियमांचं पालन करण्याचा सल्ला दिला आहे. आपत्कालीन

परिस्थितीत, +९७ २३ ५२ २६ ७४ ८ या क्रमांकावर दूतावासाशी संपर्क साधण्याचं आवाहन इस्त्राइलमधल्या भारतीय दूतावासनं केलं आहे.

**<><><><><>**

तटरक्षक दलानं आज सकाळी पाल्कच्या धुनीमधून १० मासेमारांची सुखरुप सुटका केली. तटरक्षक दलाच्या रामेश्वरम नजिकच्या मंडपमं इथं तैनात असलेल्या बोटीनं या दुर्घटनाग्रस्त बोटीवरुन मच्छिमार आणि बोटीवरच्या कर्मचाऱ्यांची सुटका केली. तटरक्षक दलानं ही बोट आणि त्यावरच्या सर्वांना सुखरुप बाहेर काढून पंबन किनाऱ्यावर मासेमारी विभागाच्या स्वाधीन केलं.

**<><><><><>**

भारतीय खेळाडूंनी चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई स्पर्धांमध्ये १०७ पदक मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ऑलिम्पिक, राष्ट्रकूल स्पर्धा आणि आशियाई स्पर्धा या तीन महत्त्वांच्या स्पर्धांपैकी भारतानं कधीही एवढी पदकं जिंकली नव्हती. नवी दिल्लीत २०१० मध्ये झालेल्या राष्ट्रकूल स्पर्धांमध्ये भारताला १०१ पदकं मिळाली होती.

महिला आणि पुरुष कबड्डी, पुरुष क्रिकेट, बॅडमिंटन दुहेरी, महिला आणि पुरुषांची कंपाऊड तिरंदाजी अशा ६ सुवर्णपदकांची कमाई भारतीय खेळाडूंनी आज केली.

पुरुषांच्या कब्बडी संघानं इराणला, महिलांच्या कब्बडी संघानं तैपेईला अंतिम सामन्यात पराभूत केलं. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं देशाला पहिल्यांदाच या स्पर्धांमध्ये पुरुष दुहेरीत सुवर्णपदक मिळवून दिलं.

अफगाणिस्तान विरुद्ध झालेला क्रिकेटचा अंतिम सामना पावसामुळं रद्द झाला आणि भारतीय संघाला सुवर्णपदक मिळालं. ओजस देवतळे यांनं कंपाऊड

तिरंदाजीत सुवर्ण तर अभिषेक वर्मानं कांस्य पदक जिंकलं. ज्योती सुरेखा वेन्नम हिनंही याच प्रकारात सुवर्ण आणि आदिती स्वामीनं कांस्य पदक पटकावलं.

भारतीय महिला आणि पुरुष बुद्धीबळ संघाला तसंच कुस्तीमध्ये दीपक पुनियाला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. महिला हॉकीत भारतीय संघाला कांस्य पदक मिळालं.

**<><><><><>**

अफगाणिस्तानच्या पश्चिम भागात आज झालेल्या भूकंपात पंधरा जणांचा मृत्यू झाला. ७८ जण जखमी झाले आहेत. ६ पूर्णांक ३ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचा केंद्रबिंदू हेरात शहराच्या वायव्येला ४० किलोमीटर अंतरावर होता, असं अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षणनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत उद्यापासून भारताच्या सामन्यांना सुरुवात होणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धचा हा सामना दुपारी २ वाजता चेन्नईत सुरू होईल.

विश्वचषक स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात बांग्लादेशानं अफगाणिस्तानला ६ गड्यांनी नमवलं. १५७ धावांचं लक्ष्य बांग्लादेशानं ३५ व्या षटकात गाठलं.

दक्षिण आफ्रिकेचा श्रीलंकेविरुद्धचा सामना नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरु आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. दक्षिण आफ्रिकेनं श्रीलंकेपुढे विजयासाठी ४२९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा श्रीलंकेनं १७ षटकांत ४ बाद १२३ धावा केल्या होत्या.